# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २५.०७.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २४/०७/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १७,१००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२४/०७/२०२२ रोजी दारूबंदी कायदयाअंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन गोरेगाव ०४,हटटा ०१,कुरूंदा ०१ वसमत ग्रा.१,बासंबा ०१ असे एकुण ०८ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांकडुन २१.२४ लिटर दारू असा एकुण ५०,३५९/—रू. कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २४/०७/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०१ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.
आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये
जुगार खेळवणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.२४/०७/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे वसमत ग्रा. येथे ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रू. असा एकुण ६२०/—रू माल जप्त करण्यात आला असुनआरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपासकरण्यात येत आह.

**चोरी :—**

दिनांक २४/०७/२०२२ रोजी फिर्यादी सचिन नवनाथराव देशमुख व्य.डॉक्टर रा.नविन बस स्थानका जवळ आ.बाळापुर ता.कळमनुरी जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे नर्सी.येथे कलम ३९४,३४,५११भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२४.०७.२२ रोजी चे रात्री ०२:३० वा चे सुमारास आ.बाळापुर येथे फिर्यादीचे घरी व दवाखाण्यात नवीन बस स्थानका जवळ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस थापडा बुक्यांनी मारहाण करून तसेच फिर्यादीचे दवाखाण्यातील विकास घोगडे यास लोखंडी रॉडने मारून जखमी करून फिर्यादीचे कपाटातील नगदी दोन लखा रूपये तसेच फिर्यादीचे व त्याचे पत्नीचे सोन्याचे दागिने अंदाजे २ लाख रू आसा एकुण चार लाख रू मुददेमाल चोरून नेला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात आ. बाळापुर पोलीस तपास करित आहेत.

दिनांक २४/०७/२०२२ रोजी फिर्यादी अभय बालासाहेब कोसलगे रा.पाण्याच्या टाकीजवळ कारखानारोड वसमत यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत शहर येथे कलम ४५७,३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२२.०७.२२ रोजी चे ०१:०० ते ०२ वा चे सुमारास अग्रवाल कॉम्प्लेक्स मधील श्री गिरीराज मोबाईल शॉपी ॲन्ड गिरीराज सेल्स ॲन्ड सर्व्हीस वसमत येथे यातील फिर्यादीचे दुकानाचे अज्ञात चोरटयांनी शटर वाकुन अर्धवट उघडुन दुकानात प्रवेश करून दुकानातील १) दोन यु.पी.एस. व दोन बॅटऱ्या कि.३१०४६ रू २) सोलर ईव्हरटर १० केव्ही कि.८४८५१ रू ३) दोन सोलर ईव्हरटर ५ केव्हीचे कि.८६९१२ रू आसा एकुण २,०२,८०९ रू मुद्देमाल चोरून नेले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात वसमत शहर पोलीस तपास करित आहेत.

फसवणुक :—दिनांक २४/०७/२०२२ रोजी फिर्यादी कौशल्याबाई किशन नरवाडे व्य.घराकाम रा.राहोली ता.जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली ग्रा.येथे कलम ४०६,४२० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२२.०७.२२ रोजी चे १२:३० वा चे सुमारास मौजे राहोली खु येथील थोडया अंतरावर कचारा कुंडी जवळ अज्ञात इसमाने फिर्यादीचे घरी येवुन तुमच्या मुलाला मोबाईलवर ३००००० रू ची लॉटरी लागली आहे असे सांगुन फिर्यादीस विश्वासात घेवुन फिर्यादी कडील सोन्या चांदीचे दागीने व एक मोबाईल असा एकुण १,२६,००० रू मुद्देमाल घेवुन गेला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली ग्रा.पोलीस तपास करित आहेत.

पोलीस अधिक्षक हिंगोली
करिता